## दि अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,अकोला
## चेकबुक छपाई करीता स्टेशनरी खरेदी करावयाच्या निविदेच्या अटी व शर्ती

१) बँकेला चेकबुक छपाई करीता खालील प्रमाणे स्टेशनरी खरेदी करावयाची आहे.

| | नग |
|---|---|
| १. मायकर चेक्स् (CTS 2010) नुसार | ५००,००० |
| २.टॉप बॉटम कव्हर | ३६,००० |
| ३. रिकेस्ट स्लिप | ४०,००० |
| ४.रेकॉर्ड स्लिप | ६०,००० |
| ५.स्टिकर | ४०,००० |

२) चेक हे आरबीआय ने निर्देशीत केलेल्या CTS 2010 ला अनुसरुन असावेत. तसेच सदरचे स्टेशनरीचा नमुना बँकेचे स्टेशनरी विभाग, मुख्य कचेरी, सिव्हील लाईन, अकोला येथे दि. 08/05/2026 पासुन कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळेल.

३) **चेक लिफचे परफोरेशनचा दर्जा उत्तम असावा जेणेकरुन चेकबुक होल्डरला चेक हाताळणे सोयीचे राहील. हयाकरीता चेकबुकचा नमुना सादर करणे आवश्यक राहील.**

४) छपाई निविदा भरतांना निविदे सोबत रू.१०,०००/- (अक्षरी रू.दहा हजार फक्त) अनामत रक्कम चेक/डि.डि.व्दारे भरणा करावी लागेल.अनामत रक्कमेवर व्याज अथवा अन्य प्रकारचा आर्थिक लाभ देण्यात येणार नाही.

५) सशर्त निविदा पाठवु नये सशर्त निविदे मधील दराचा विचार करण्यात येणार नाही.

६) निविदे मधील दर सर्व टॅक्सेससह असावेत. निविदा भरणारे व्हेंडरजवळ जी.एस.टी. नंबर असणे आवश्यक आहे. निविदा संबंधीत फर्मचे नावाने असलेल्या लेटर पॅडवरच प्रोप्रायटरचे स्वाक्षरीसह असावी.

७) निविदे सोबत वरील नमुद अ.क्र.१ ते ५ चे ॲटम्स् नमुने सादर करावे लागतील. त्यावर निविदा धारकाचे नाव, सही असणे आवश्यक राहील.नमुने नसलेले निविदेचा विचार करण्यात येणार नाही.

८) चेकबुक छपाई स्टेशनरी खरेदी दिलेल्या मुदतीत पुर्ण करून न दिल्यास १०% रक्कम दंड म्हणून बिलातून कपात करण्याचा बँकेस अधिकार राहील व कपात केलेली रक्कम परत दिली जाणार नाही.

९) चेकबुक स्टेशनरी खरेदी करून दिल्यानंतर अनामत रक्कम ३० दिवसांनी परत करण्यात येईल.

१०) सदर काम नमुन्यानुसार अगर समाधानकारक नसल्यास किंवा त्यामध्ये कोणतीही उणीव असल्यास ऑर्डर पुर्णत: नाकारण्याचा अधिकार बँकेस राहील. त्याबाबतचे नुकसानीस बँक जबाबदार राहणार नाही.

११) खरेदीची ऑर्डर दिल्यानंतर ठरलेल्या मुदतीत चेकबुक स्टेशनरी छपाई ॲटम्स् न पुरविल्यास सदर खरेदी ईतरांकडून करून घेण्यात येईल व त्या अनुषंगाने होणारा सर्व प्रकारचा अतिरिक्त खर्च, छपाई काम मंजूरात असलेल्या निविदा धारकाकडून वसुल करण्यात येईल.

१२) ऑर्डर मधील पूर्ण ॲटम्स एकाच वेळी बँकेत द्यावे लागेल. चेकबुक, स्टेशनरीची पोहोच मिळाले बाबत कोणताही वेगळा चार्ज दिला जाणार नाही. अपूर्ण ॲटम्स् स्विकारण्यात येणार नाही.

१३) ऑर्डर पोटी ॲडव्हान्स मिळणार नाही.

१४) ऑर्डर पुरविणेस कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ मिळणार नाही.

१५) निविदा भरतांना दर हे जी.एस.टी.सह असावे बिल सादर करतांना विलावर जी.एस.टी.नंबर नमुद असावा.

१६) कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचे, उपरोक्त अटी व शर्तीत बदल करणे, सुधारणा करणे बाबतचे सर्व अधिकार बँक राखून ठेवत आहे.

१७) स्टेशनरी खरेदी बाबतची निवीदा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी ,दि अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., मुख्य कचेरी, सिव्हील लाईन, अकोला या नावाने सिलबंद पाठवावी.

कोटेशन स्विकारणेची अंतिम तारीख :- 13/05/2026

वेळ सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत.

मुख्य कार्यकारी अधिकारी

Estate.Record/139